पिंपरी-चिंचवडसाठी जिल्हा, अतिरिक्त सत्र न्यायालयाची स्थापना

e Paper



# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 30/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 168 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तिन्ही राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण करा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची केंद्रीय मंत्री नितीन गडकरींकडे मागणी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पुणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी या भागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड), राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत), तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी (तळेगाव-चाकण-शिक्रापूर) या तिन्ही प्रमुख राष्ट्रीय महामार्गाचे तातडीने रुंदीकरण करावे, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**



उपमुख्यमंत्री पवार यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, पुणे महानगर आणि औद्योगिक परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता पुणे परिसरातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड) - सध्या ४ लेन असलेला हा रस्ता ६ लेनमध्ये रुपांतरित करावा, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत) - विद्यमान ४ लेन रस्त्याचे ६ लेनमध्ये रूपांतर करावा, तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८डी (तळेगाव-चाकण-शिक्रापूर) - सध्या २ लेन असलेला मार्ग ४ लेन करण्याची आवश्यकता आहे. या तिन्ही मार्गांवर शिक्षण संस्था, औद्योगिक पट्टा, वसाहती, रुग्णालये, पेट्रोलियम आणि वाहन उद्योग तसेच व्यापारी हब असल्यामुळे वाहतुकीचा ताण प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे. रस्त्यांवर सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून वाहनचालकांच्या सुरक्षेवरही प्रश्न निर्माण झाले आहेत.

उपमुख्यमंत्री पवार यांनी पत्रात पुढे म्हटले आहे की, या मार्गांवरील प्रवास करणाऱ्या वाहनांच्या संख्येची कमाल मर्यादा ओलांडली आहे. अशा परिस्थितीत या महामार्गावर तात्काळ लेन वाढवण्याचे काम करण्यात यावे, जेणेकरून येत्या काळात उभारल्या जाणाऱ्या एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामासाठीही पर्यायी मार्ग उपलब्ध होऊ शकेल.

हे तिन्ही महामार्ग पुणे शहराच्या प्रवेशद्वारांशी जोडले गेलेले असल्यामुळे, बाह्य भागातील मोठ्या प्रमाणावर वाहने शहरात प्रवेश करताना मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. यामुळे या मार्गांवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

तसेच, तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील रुंदीकरणाच्या कामास सध्या चालू असलेल्या एलिव्हेटेड हायवे निविदेच्या अंतिम टप्प्यापर्यंत तात्पुरता पर्याय म्हणूनही उपयोग होईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रस्तावास मान्यता देऊन आवश्यक निधी आणि प्रशासकीय मंजुरी तातडीने मिळवून देण्याची विनंती उपमुख्यमंत्री पवार यांनी केली आहे, जेणेकरून पुणे औद्योगिक परिसरातील वाहतूक समस्या दूर होण्यास मदत होईल.

# आ.अण्णा बनसोडे यांच्या हस्ते अपघातग्रस्त कुटुंबाला मदतीचा धनादेश सुपूर्द

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे येथील टाटा मोटर्स या कंपनीतील कंत्राटदार नियुक्त कंत्राटी कामगार पुष्पेंद्र कुमार यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी कामगार आयुक्त, टाटा कंपनीचे अधिकारी यांना पीडित कुटुंबाला तत्काळ आर्थिक मदत देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते पीडित कुटुंबाला 35 लाख रूपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.**




विधानसभा उपाध्यक्ष यांच्या दालनात झालेल्या पत्रकार परिषदेत टाटा मोटर्सचे व्यवस्थापक, कामगार विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी व कामगार नेते आदी उपस्थित होते.

उपाध्यक्ष अण्णा बनसोडे म्हणाले की, अपघातानंतर कामगारांच्या कुटुंबांची जबाबदारी कंपनीने घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सर्व संबंधित अधिकारी, पोलिस विभाग आणि कॉन्ट्रॅक्टर यांच्या सहकार्याने पीडित कुटुंबाला 35 लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय झाला, हे समाधानकारक असल्याचे श्री. बनसोडे यांनी सांगितले.

या निर्णयामुळे पीडित कुटुंबाला दिलासा मिळाला असून, पुढील काळातही व्याजाच्या स्वरूपात त्यांना आधार मिळणार आहे, असेही उपाध्यक्ष श्री.बनसोडे यांनी सांगितले.

मृत्यू झालेल्या पुष्पेद्रकुमार यांना कंत्राटाचे काम दिलेले होते. या घटनेची गंभीरता लक्षात घेऊन मे.टाटा मोटर्स यांनी पीडित कुटुंबाला 30 लाख रुपये मुदत ठेव स्वरुपात आणि त्यावरील व्याजातून दर महिन्याला कुटुंबाला आर्थिक मदत देण्याचे मान्य केले. तसेच, खर्चासाठी 5 लाख रुपये पीडित कुटुंबाला देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# वाहतूक कोंडीवर तातडीने उपाययोजना करावी-विशाल काळभोर

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील आकुर्डी खंडोबा चौक येथे महा मेट्रोचे काम सुरू आहे त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे या होणाऱ्या वाहतूक कोंडीवर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी राष्ट्रवादी पक्षाची युवा नेते विशाल काळभोर यांनी केली आहे.शहरातील आकुर्डी खंडोबा चौक येथे महा मेट्रोचे काम सुरू आहे त्या वाहतूक कोंडी बाबत उपाय योजना करावी तसेच वळण घेऊन चिंचवड कडे जातांना मध्येच लाल सिग्नल लागल्याने ट्रॅफिक पोलिस यांचे बरोबर वादावादी होते . चिंचवड ते आकुर्डी व आकुर्डी ते पुन्हा चिंचवड या मार्गावर पत्रे लावल्याने रस्ता अरुंद झाला आहे . यासाठी बी.आर. टी मार्गातून वाहतूक करण्यास परवानगी मिळावी (चौक परिसर) आकुर्डी. तसेच खंडोबा मंदिरा समोरील जय मल्हार चौक खडी मशीन येथेही सर्कल मोठा आहे . त्याचा व्यास कमी करणे तेथे सिग्नल लावून वाहतूक कर्मचारी नेमावा अशी मागणी चे निवेदन विशाल काळभोर यांनी पोलिस निरीक्षक यांना पत्र दिले.



# 'सत्यभामा' 8 ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




नेहमीच रुपेरी पडद्यावरील कलाकृतींच्या माध्यमातून इतिहासाची पाने उलगडण्याचा प्रयत्न केला जातो. अशा कलाकृती रसिकांना केवळ भूतकाळात नेत नाहीत, तर त्या काळातील वास्तवतेचे दर्शनही घडवतात. बऱ्याचदा त्या काळातील काही चांगल्या-वाईट घटना वर्तमानातील जीवन सुखकर बनवण्यासाठी उपयोगी ठरतात. काही मात्र मनाला चटका लावून जातात. पूर्वीची सती प्रथा आज बंद झाली तरी ती पडद्यावर पाहताना मनाची घालमेल झाल्याशिवाय राहात नाही. याच प्रथेवर आधारलेला 'सत्यभामा' हा मराठी चित्रपट ८ ऑगस्टला महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे.

श्री साई सृष्टी फिल्म्स एलएलपी प्रस्तुत 'सत्यभामा' या चित्रपटाची निर्मिती मनीषा पेखळे, सारंग मनोज,अंकुर सचदेव आणि वीरल दवे यांनी केली आहे. 'सत्यभामा'चे दिग्दर्शन सारंग मनोज आणि अभिजीत झाडगावकर यांनी केले आहे. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवादलेखन मनीषा पेखळे यांनी केले आहे. प्रियकर-प्रेयसीच्या प्रेमकथेसोबतच यात भाऊ-बहिणीच्याही प्रेमाची गोष्टही आहे. सतीच्या प्रथेत कित्येक निरपराध स्त्रीयांचा बळी जात असल्याचे पाहून नायकाचे मन उद्विग्न होते आणि त्याला जीवनाचा उद्देश सापडतो. चित्रपटाचा नायक सती प्रथेविरोधात लढा देण्यासाठी जणू क्रांतीची मशाल पेटवतो. त्याच्या संघर्षाची अनोखी कहाणी म्हणजेच 'सत्यभामा' हा चित्रपट आहे. या चित्रपटाने ईस्टर्न युरोप फिल्म फेस्टिव्हल, स्वीडन फिल्म फेस्टिव्हल, जागरण फिल्म फेस्टिव्हल, बर्लिन लिफ्ट-ऑफ फिल्म फेस्टिव्हल अशा देश-विदेशांतील मानाच्या चित्रपट महोत्सवांमध्येही हजेरी लावली आहे.

हा चित्रपट प्रेक्षकांना केवळ स्वातंत्र्यपूर्व काळात नेणार नसून, त्या काळातील वातावरण आणि विचारसरणीचेही दर्शन घडविणारा आहे. आज आपण प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात जगत आहोत. स्त्रियांनाही जगण्याचा समान अधिकार आहे, पण त्या काळातील स्त्रीयांनी जे भोगले ते शत्रूच्याही वाट्याला येऊ नये असे 'सत्यभामा' पाहिल्यावर रसिकांना वाटेल. हा केवळ एक चित्रपट नसून, एक विचार आहे, जो सर्वदूर पोहोचण्याची गरज आहे. कारण आजही रूढी-परंपरांच्या नावाखाली देशाच्या कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यात स्त्रियांवर अत्याचार होतच आहेत. दर्जेदार निर्मितीमूल्यांच्या आधारे एक स्ट्राँग संदेश देणारा हा चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच आवडेल असा ठाम विश्वास निर्माते आणि दिग्दर्शक यांना आहे.

'सत्यभामा'मध्ये माधव अभ्यंकर, अभिजीत आमकर, भाविका निकम, सृष्टी मालवंडे, ज्योती पाटील, सारंग मनोज, ज्ञानेश्वर शिंदे, मुकुंद कुलकर्णी, दिपाली व योगेश कंठाळे आदी कलाकारांनी विविध व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. याखेरीज ऋषिका सूर्यवंशी, अर्नव शिंदे, लोकेश देवकर, अर्नव तेलंग आदी बालकलाकारांचा अभिनयही लक्ष वेधणार आहे. मनीषा पेखळे यांनी गीते लिहिली असून संगीतकार निखिल महामुनी यांनी ती संगीतबद्ध केली आहेत. हनी सातमकर यांनी पार्श्वसंगीत दिले असून, कोरिओग्राफी नरेंद्र पंडीत यांची आहे. कला दिग्दर्शन सचिन एच. पाटील यांनी केले असून, सिनेमॅटोग्राफी डिओपी जितेंद्र रामचंद्र आचरेकर यांनी केली आहे. सुमीत ओझा यांनी व्हीएफएक्स केले असून, संकलन निलेश गावंड यांनी केले आहे. मेकअप नितीन दांडेकर यांनी, तर कॉस्च्युम डिझायनिंगसह स्टाईल शीतल लीना लहू पावसकर यांनी केली आहे. फाईट मास्टर मोहित सैनी यांनी दिग्दर्शित केलेली साहसदृश्ये खिळवून ठेवणार आहेत. या चित्रपटाचे प्रोडक्शन कंट्रोलर अकबर शेख असून, कास्टिंग समन्वयक कुंडलिक कचले आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 30/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पिंपरीतीत विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला!

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरीतील संत तुकारामनगर येथील एका महाविद्यालयाच्या फ्रेशर पार्टीवरून झालेल्या वादामुळे एका विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला करण्यात आल्याची घटना सोमवारी (२८ जुलै) घडली.याबाबत एका विद्यार्थ्याने संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, सहा जणांना अटक करण्यात आली आहे. तर, त्यांच्या इतर साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार आणि त्याचा मित्र नेहमीप्रमाणे महाविद्यालयात आले होते. दोन आरोपींनी फ्रेशर पार्टीला जाण्यावरून वाद घातला. त्याला शिवीगाळ केली. सकाळी साडेअकरा वाजता महाविद्यालय सुटल्यानंतर प्रवेशद्वारावर त्यांच्या ओळखीचे अन्य मित्रांनी यांनी तक्रारदाराला बोलावून घेतले. त्यांपैकी एकाने तक्रारदाराच्या अंगावर त्याच्या ताब्यातील दुचाकी घातली. एकाने लोखंडी कोयता डोक्यात आणि डाव्या हाताला मारून त्याला गंभीर जखमी केले. तसेच तक्रारदाराच्या जुन्या घराशेजारी राहणारा एकानेही त्याच्या ताब्यातील दुचाकी अंगावर घातली. त्याने जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या हातात असलेला लोखंडी कोयता पाठीवर मारून गंभीर जखमी केले. त्यानंतर "आम्ही या महाविद्यालयाचे भाई आहोत" असे ओरडत, कोयते हवेत फिरवत दहशत निर्माण केली आणि तेथून निघून गेले. संत तुकारामनगर पोलीस तपास करीत आहेत.




# महानगरपालिका जनसंवाद सभेत नागरिकांच्या 72 तक्रार वजा सूचना प्राप्त

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : महापालिकेच्या वतीने पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ७२ तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या आहे. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक आणि महापालिका प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुषंगाने आज जुलै महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या आठ क्षेत्रीय कार्यालयात आज जनसंवाद सभा पार पडली. यावेळी नेमून दिलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद भूषविले.

आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे ७, ९, ८, १४, ९, ४, ६,आणि १५ अशा एकूण ७२ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. यावेळी नागरिकांनी शहरातील वाहतुकीला होणारा अडथळा, शहरात ठिकठिकाणी पडणारा कचरा, पावसामुळे रस्त्यावर पडलेले खड्डे, तुंबलेल्या गटारांची साफसफाई, जेष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या सेवा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांची पूर्तता, महापालिका दवाखान्यात नागरिकांना मिळणाऱ्या सेवा सुविधा, रस्त्यांवर वाढलेल्या भिकाऱ्यांची संख्या आदी तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.



# देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डातील समस्या सोडविण्यासाठी निधी द्या

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत निधीअभावी मागील चार वर्षांपासून विकास कामे रखडली आहेत. या भागातील विकासासाठी निधीची आवश्यकता आहे. संरक्षण विभागाने निधी द्यावा अशी मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी संरक्षण विभागाचे महानिदेशक एस.एन.गुप्ता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. तसेच देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पुष्पांजली रावत या नागरिकांना भेटतही नसल्याची तक्रारही त्यांनी केली.**



खासदार श्रीरंग बारणे यांनी दिल्लीत संरक्षण विभागाचे महानिदेशक एस.एन.गुप्ता यांची भेट घेतली. देहूरोडच्या विकासाबाबत निधी देण्याची मागणी केली. देहूरोडमध्ये कोणती कामे रखडली आहेत. याबाबतचे सविस्तर निवेदन दिले. खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, मावळ लोकसभा मतदारसंघात देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा समावेश आहे. देहूरोडमध्ये मागील चार वर्षांपासून नगरसेवक नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून कामकाज केले जाते. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पुष्पांजली रावत या नागरिकांना भेटत नाहीत. अशा नागरिकांच्या तक्रारी आहेत. नागरिकांची किरकोळ कामेही होत नाहीत. चार वर्षांपासून विकास कामे रखडली आहेत. रस्ते, स्ट्रीट लाईट, पिण्याचे पाणी, प्रदूषण, सार्वजनिक स्वच्छतागृहा निर्माण करावे. शेलारवाडीत श्री स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय निर्माण करावे.

शीतळानगर येथील श्रीराम मंदिर परिसरात उद्यान, योग, ध्यान केंद्र, वॉकिंग ट्रॅक, सांस्कृतीक सभागृह उभारावे. लहान मुले, युवकांना धावण्यासाठी धावपट्टी, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, क्रिकेट आदी खेळांसाठी मैदान विकसित करावे. देहूरोड बाजारपेठेत छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक बनवावे. स्वर्गीय मीनाताई ठाकरे उद्यान विकसित करावे.

या दोन्ही कामासाठी मान्यता आणि निधी द्यावा. शेलारवाडी येथील अमरजाई देवी पालखी मार्गावर स्वागत कमान उभारावी. त्याला गावातील अध्यात्मिक क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते नबाजी भाऊगुजे शेलार यांचे नाव द्यावे. या कामासांठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली आहे

# पिंपरी-चिंचवडसाठी जिल्हा, अतिरिक्त सत्र न्यायालयाची स्थापना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरासाठी न्याय क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकण्यात आले असून, येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अशा दोन न्यायालयांची स्थापना केली आहे. तसेच, राज्य सरकारच्या कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत या न्यायालयांसाठी आवश्यक पदांना मंजुरीही देण्यात आली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरातील पक्षकार आणि विधीतज्ञांकडून गेल्या अनेक वर्षांपासून पिंपरी-चिंचवड न्यायालयाचा विस्तार व्हावा, अशी मागणी होत होती. याबाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

वास्तविक, दि. १ मार्च १९८९ साली पिंपरी-चिंचवड न्यायालयाची स्थापना झाली. मात्र, अद्याप इमारतीचा प्रश्न सुटला नव्हता. पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक व नागरी शहरात स्वतंत्र न्यायालयांची गरज गेल्या अनेक वर्षांपासून भासत होती. पक्षकारांना आणि वकिलांना न्यायासाठी पुण्याला जावे लागणे, वेळ आणि पैसा वाया जाणे, यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.

आमदार महेश लांडगे यांनी ही गरज ओळखून विधि व न्याय विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या हद्दीत बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील सेक्टर नंबर – १४ येथे सुमारे १६ एकर क्षेत्राची जागा महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेली आहे. या ठिकाणी पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुल उभारणीची पायाभरणी करण्यात आली आहे. आता जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अशा दोन न्यायालयांची स्थापना केली आहे. भाजपा महायुती सरकारच्या या सकारात्मक भूमिकेचे विधी क्षेत्रातील तज्ञ आणि पक्षकारांमधून स्वागत होत आहे. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अशा दोन न्यायालयांची स्थापना केली. या न्यायालयांच्या स्थापनेमुळे आता पक्षकारांची गैरसोय टळणार आहे. स्थानिक वकिलांना संधी मिळणार आहे. न्यायप्रक्रियेला गती मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा न्यायिक दर्जा उंचावणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968